# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.

E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक:२अ/एडीएम/प्रवेश/२०१७/८८

दिनांक : 17 JAN 2018

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/नागपूर/अमरावती

**विषय:- शैक्षणिक वर्ष २०१८ -१९ मधील वास्तुशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी NATA परीक्षा आवश्यक असण्याबाबत.**

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन राजपत्र क्र.१०२, अधिसुचना क्र.टिईएम-२०१६/सीआर४७३/टिई- ४ (भाग १), दि. २४.४.२०१७ व तदनंतर वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार राज्यातील वास्तुशास्त्र पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश कौन्सिल ऑफ आर्किटेक्चर ,नवी दिल्ली यांचेवतीने घेण्यात येत असलेली National Apptitude Test in Architecture (NATA)आणि राष्ट्रीय स्तरावरील JEE (Main) (Paper II) या प्रवेश परीक्षेत पात्र ठरलेल्या व निर्धारीत केलेल्या गुणांच्या आधारे करण्यात येतात.

वरील बाब विचारात घेऊन राज्यातील प्रथम वर्ष पदवी वास्तुशास्त्र अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक वर्ष २०१८ - १९ मध्ये प्रवेश घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी राष्ट्रीय स्तरावर घेण्यात येणारी NATA ही प्रवेश परीक्षा द्यावी. सदर परीक्षा दि. २९.०४.२०१८ रोजी घेण्यात येणार आहे. या परीक्षेसाठीची Registration प्रक्रिया दि. १६/०१/२०१८ पासून सुरु झाली असून त्यांचा अंतिम दिनांक ०२.०३.२०१८ असा आहे. याबाबतची अधिक माहिती www.nata.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. तरी आपल्या विभागातील सर्व वास्तुशास्त्र पदवी महाविद्यालयाना तशा सूचना देण्यात याव्यात व सोबतची अधिसूचना त्यांच्या महाविद्यालयातून सूचना फलकावर प्रवेशोच्छुक विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी दर्शविण्याबाबत त्यांना कळविण्यात यावे.

(डॉ.अभय वाघ)

संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई

प्रत: प्राचार्य, सर्व वास्तुशास्त्र पदवी अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्थांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास येईल अशा पध्दतीने सुचनाफलकावर सोबतची अधिसूचना प्रसिध्द करण्यात यावी.

E:\Budage\2018-19\Architecture\Notice for appear NATA exam.docx